**ठळक बातम्या**

- ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात अभिनेता मोहनलाल यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान / ४ मराठी बालकलाकारांसह आशिष बेंडे, सुजय डहाके, 'शामची आई' चित्रपटही पुरस्कारानं सन्मानित

- महाराष्ट्रात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना २ हजार २१५ कोटी रुपये मदत करण्याचे शासन आदेश जारी, अतिवृष्टीमुळे ७० लाख एकरांवरच्या पिकांचं नुकसान झालं असल्याचा अंदाज

- महाराष्ट्रातल्या ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

**आणि**

- विख्यात क्रिकेट पंच हॅरॉल्ड डिकी बर्ड यांचं निधन

**<><><><>**

७१वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आज नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. चित्रपट क्षेत्रातल्या अमूल्य योगदानासाठी मल्याळी अभिनेता 'मोहनलाल' यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरवण्यात आलं. सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार 'ट्वेल्थ फेल' या चित्रपटाला मिळाला. सर्वोत्कृष्ट लोकप्रिय चित्रपटाचा पुरस्कार 'रॉकी और रानी की प्रेमकहानी' या सिनेमाला मिळाला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार 'जवान' साठी शाहरूख खान आणि 'ट्वेल्थ फेल' साठी विक्रांत मस्सी यांना विभागून देण्यात आला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार 'मिसेस चॅटर्जी वर्सेस नॉर्वे' या सिनेमातल्या भूमिकेसाठी राणी मुखर्जी यांना मिळाला. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शकीय पदार्पणासाठी 'आत्मपँफ्लेट' या मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक आशिष बेंडे यांना सुवर्ण कमळ मिळालं. तर मराठीतला सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला 'शामची आई'. 'श्यामची आई' साठीचा पुरस्कार अमृता राव यांनी स्वीकारला, दिग्दर्शक सुजय सुनील डहाके यांना दिग्दर्शकाचं रजत कमळ मिळालं. राष्ट्रीय चित्रपट महामंडळाच्या 'लेंटीना आओ' या चरित्रात्मक माहितीपटाला, तसंच

भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेला ‘फ्लॉवरिंग मॅन’ या माहितीपटासाठी पुरस्कार मिळाले. सर्वोत्कृष्ट बालकलाकारांमधेही ४ मराठी बालकलाकारांचा समावेश होता. ‘नाळ - दोन’ ला सर्वोत्कृष्ट बालचित्रपटाचा पुरस्कार मिळाला. मेघना गुलजार यांना ‘सॅम बहादूर’ चित्रपटासाठी विशेष मूल्य विभागात पुरस्कार मिळाला.

**<><><><>**

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागातल्या शेतकऱ्यांना मदत करण्याचे शासन आदेश दिले असून आतापर्यंत १ हजार ८२९ कोटींची मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सांगितलं. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. उर्वरित रक्कम येत्या दहा दिवसांत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

***होल्ड बाईट मुख्यमंत्री***

आतापर्यंत ९७५ मिलिमीटर पाऊस झाला असून पुरामुळे आठ जणांचा मृत्यू झाला, तर दहा जण जखमी झाले आहेत. पूरग्रस्त भागात एनडीआरएफ, एसडीआरएफच्या सतरा तुकड्या तैनात केल्या आहेत. या भागांचा आढावा घ्यायला मंत्र्यांना आणि पालकमंत्र्यांना सांगितलं आहे, आपण स्वतः काही भागांना भेट देणार आहोत, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**अतिवृष्टीमुळे** ७० लाख एकरावरच्या पिकांचं नुकसान झालं असल्याचा अंदाज कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत व्यक्त केला. जिथं अद्याप पंचनामे झालेले नाहीत किंवा आणखी नुकसानी झालेली असण्याची शक्यता आहे तिथं शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत पोहोचवली जाईल असं आश्वासन भरणे यांनी दिलं.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा कालपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८ टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. कृषी क्षेत्रातील नव्या कररचनेविषयी जाणून घेऊयात आमच्या प्रतिनिधीकडून…

**व्हीसी**

*(जीएसटी सुधारणेमुळे कृषी क्षेत्रात अनेक अनुकूल बदल होणार आहेत. नव्या कररचनेमुळे खतं, कीटकनाशकं यांच्या किमती कमी होतील. ट्रॅक्टर, ट्रॅक्टरचे विविध भाग, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, कापणी यंत्र या सर्वांवरचा जीएसटी आता ५ टक्के झाला आहे. यामुळे यांत्रिकीकरणाला चालना मिळेल तसंच अंगमेहनतही वाचेल. ठिबक-तुषार सिंचन कमी किमतीत उपलब्ध झाल्यामुळे अधिक जमीन ओलिताखाली येईल, याचा परिणाम उत्पादन वाढीवर होणार आहे. फळं, भाज्या, लोणी, तूप यांच्यावरचा जीएसटी ५ टक्के झाला असून दूध आणि पनीरवरचा जीएसटी शून्य करण्यात आला आहे. त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढायला मदत मिळणार आहे. सौर ऊर्जेवर आधारित उपकरणांचा जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के झाला आहे. त्यामुळे सौर पम्पाचा वापर जास्तीत जास्त होईल आणि शेतकऱ्यांचा सिंचनाचा खर्च वाचेल.)*

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गेल्या अकरा वर्षांत नवोपक्रमाला प्राधान्य दिल्याचं प्रतिपादन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं आज विकसित भारत बिल्डाथॉन २०२५चं त्यांच्या हस्ते उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. शालेय विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रमाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारनं आता अटल नवोन्मेष अभियान सुरू केल्याचं त्यांनी सांगितलं.

तरुणांमध्ये सर्जनशीलता, समस्या निवारण आणि स्वावलंबन विकसित करणं हे या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. शिक्षण मंत्रालयाचा शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग, नीती आयोगाच्या अटल नवोन्मेष अभियानाच्या सहकार्याने यंदा १३ ऑक्टोबर रोजी या उपक्रमाचं आयोजन करत आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थी आजपासून ६ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी करू शकतात.

**<><><><>**

राज्यातल्या ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगानं आज जाहीर केला. या निवडणुकीसाठी १ जुलै २०२५ हा अधिसूचित दिनांक धरण्यात आला असून या दिवशी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी या निवडणुकांसाठी वापरण्यात येईल. जिल्हा परिषद निवडणूक विभाग आणि पंचायत समिती निर्वाहक गणनिहाय प्रारूप मतदार

यादी ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध केली जाईल. त्यावर १४ ऑक्टोबरपर्यंत हरकती आणि सूचना दाखल करता येणार आहेत. अंतिम मतदार यादी आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी २७ ऑक्टोबर रोजी जाहीर केली जाणार आहे.

**<><><><>**

देशातल्या तरुणांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र सरकारनं अनेक धोरणं आखली आहेत. सरकारनं उद्योजकता आणि रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या याविषयी आजच्या सेवा पर्व या विशेष मालिकेत जाणून घेऊ या........

**व्हीसी**

*(केंद्र सरकारने ऑक्टोबर २०२२ मधे देशभरात रोजगार मेळावे आयोजित केले. तरुणांना रोजगार देऊन सक्षम करणं हा याचा हेतू होता. मागच्या तीन वर्षात देशभरात १६ रोजगार मेळावे आयोजित केले असून याद्वारे १० लाखापेक्षा जास्त तरुणांना नियुक्ती पत्रं मिळाली आहेत. साडेतीन कोटी तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेची घोषणा प्रधानमंत्र्यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात केली होती……*

***होल्ड बाईट मोदी***

*स्टार्ट अप इंडिया उपक्रमाने देशात उद्योजकीय परिसंस्था उभारण्यात महत्त्वाची भूमिका निभावली आहे. या उपक्रमा अंतर्गत २०१६ पासून दीड लाख स्टार्ट अप उभे राहिले असून याद्वारे सतरा लाखांपेक्षा जास्त नोकऱ्या निर्माण झाल्या आहेत. तर प्रधानमंत्री मुद्रा योजनेमुळे लघु उद्योजकांना सहजरीत्या कर्ज उपलब्ध झालं आहे.)*

**<><><><>**

विख्यात क्रिकेट पंच हॅरॉल्ड डिकी बर्ड यांचं आज साऊथ यॉर्कशर इथं वयाच्या ९२व्या वर्षी निधन झालं. क्रिकेटच्या इतिहासातले सगळ्यात लोकप्रिय आणि अचूक निर्णय देणारे पंच असा त्यांचा लौकिक होता. १९७३ ते १९९६पर्यंतच्या कारकीर्दीत त्यांनी ६६ कसोटी, ६९ आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामने आणि ७ महिला एकदिवसीय क्रिकेट सामन्यांमध्ये पंच म्हणून काम पाहिलं.

**<><><><>**

भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर २०२५ या वर्षात ६ पूर्णांक ७ दशांश टक्के राहील, असा अंदाज आर्थिक सहकार्य आणि विकास संस्थेनं वर्तवला आहे. हा दर ६ पूर्णांक ३ दशांश टक्के राहील, असा अंदाज या संस्थेनं जून महिन्यात वर्तवला होता. वस्तू आणि सेवा कर आणि आर्थिक धोरणातल्या सुधारणांमुळे ही वाढ होईल, असं ‘वर्ल्ड इकॉनॉमिक आउटलुक’ या अहवालात म्हटलं आहे. मात्र, अमेरिकेनं लादलेल्या अतिरिक्त कराचा फटका देशाच्या निर्यात क्षेत्राला होण्याचाही अंदाज आहे.

**<><><><>**

स्वच्छता ही सेवा या मोहिमेत येत्या २५ सप्टेंबर रोजी सकाळी आठ वाजता स्वच्छता उत्सवात सहभागी होऊन श्रमदान करावं, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. स्वच्छता ही सामूहिक जबाबदारी असून हा उपक्रम देशाप्रति अभिमानाची भावना प्रतिबिंबित करणारा एक प्रेरणादायी उपक्रम असल्याचं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**//<><><><>//**